**महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास वेतन व वेतन बाबीकरिता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात माहे एप्रिल, २०२६ ते मे, २०२६ करिता अनुदान वितरीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**अल्पसंख्याक विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांक:- राअआ-२०२६/प्र.क्र.३९/का-९**

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक: २९ एप्रिल, २०२६.

संदर्भ :-

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं- २०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.९ एप्रिल, २०२६.

२) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र.राअआ २०२६/ प्र.क्र.३९/का.९,दि.२१.०४.२०२६.

३) सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांचे पत्र क्र.राअआ/लेखा/प्र.क्र.०१/का-०४/२०२५-२६, दिनांक २३.०४.२०२६.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यका आयोग, मुंबई या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व वेतनावरील बाबीकरिता अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत उपरोक्त संदर्भाधीन दिनांक २३.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांनी शासनास विनंती केली आहे. त्यानुसार सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीत निधीपैकी बीम्स प्रणालीवरील उपलब्ध निधीमधून महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई या कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतन व वेतनबाबकरिता माहे एप्रिल, २०२६ ते मे, २०२६ या कालावधीकरिता अनुदान वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई या कार्यालयासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये "मागणी क्र. झेडई -१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (१६) राज्य अल्पसंख्याक आयोग २२३५ ए २४९ (अनिवार्य), ३६ सहायक अनुदाने (वेतन)" या लेखाशिर्षातर्गत एकूण रु.१,११,१४,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी अकरा लक्ष चौदा हजार फक्त) इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

२. वित्त विभागाने "मागणी क्र. झेडई -१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (१६) राज्य अल्पसंख्याक आयोग २२३५ ए २४९ (अनिवार्य), ३६ सहायक अनुदाने (वेतन)" या

लेखाशिर्षांतर्गत बीम्स प्रणालीवर अर्थसंकल्पित निधीच्या ६० टक्के प्रमाणे उपलब्ध करुन दिलेल्या रु.६६,६८,४००/- निधीपैकी रु.५५.५७ लक्ष इतका निधी वितरणाकरिता उपलब्ध आहे. त्यानुसार, सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांनी संदर्भाधीन पत्रान्वये मागणी केल्यानुसार बीम्स प्रणालीवर उपलब्ध निधीमधून, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगातील अधिकारी / कर्मचारी यांचे माहे एप्रिल, २०२६ ते मे, २०२६ या कालावधीतील वेतन व वेतनबाबीकरिता रु.१६,६६,०००/- (अक्षरी रुपये सोळा लक्ष सहासष्ट हजार फक्त) इतके अनुदान महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| लेखाशिर्ष | सन २०२६-२७ करिता अर्थसंकल्पिय तरतूद | यापूर्वी वितरित निधी | या आदेशान्वये वितरित करण्यात येत असलेला निधी |
|---|---|---|---|
| राज्य अल्पसंख्याक आयोग २२३५ ए २४९ (अनिवार्य), ३६, सहायक अनुदाने (वेतन) | रु.१,११,१४,०००/- | रु.११,११,४००/- | रु.१६,६६,०००/- |
| | | **एकूण** | **रु.१६,६६,०००/-** |
| | | | **(अक्षरी रुपये सोळा लक्ष सहासष्ट हजार फक्त)** |

३. सदर तरतूद सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत असून याकरीता, अवर सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई हे आहरण व संवितरण अधिकारी तर सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई हे नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाने सन २०२६-२७ च्या मासिक निधी विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे आयोगाच्या कार्यालयाचा खर्च विहित मर्यादेत राहील याची दक्षता घेण्यात यावी. वेतन या लेखाशिर्षांतर्गत वितरीत करण्यात आलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात यावा. या आदेशान्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीतून केलेल्या खर्चाचा तपशील, उपयोगिता प्रमाणपत्र Utilization Certificate शासनास सादर करावे. तसेच संदर्भ क्र. (१) मधील वित्त विभागाच्या शासन परिपत्रकान्वये विहीत अटी व तरतुदींचे काटेकोरपणे पालन महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांनी करावे.

४. उपरोक्त बाबीवरील खर्च "मागणी क्र. झेडई -१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (१६) राज्य अल्पसंख्याक आयोग २२३५ ए २४९ (अनिवार्य), ३६, सहायक अनुदाने (वेतन)" या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या वर्षाकरिता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून खर्ची टाकण्यात यावा.

५. "सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि. १७ एप्रिल, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत किंवा त्या त्या विभागास वेळोवेळी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग -२ अन्वये प्रदान करण्यात

आलेल्या अधिकारानुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२६/ प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६ मधील अटींची तसेच सोबतच्या परिशिष्टामधील सर्व बाबींची पुर्तता करण्याच्या अटीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे."

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२६०४२९१६३८३९१८१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

MANOJ
DATTATRAYA
JADHAV

Digitally signed by MANOJ DATTATRAYA JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MDD,
2.5.4.20=A83FC829949E9B1A022B031436C946028B48D51F
5A1BF36CA3CE4FEAD857DA72, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=2766AFDA86350272237DCF9A191545970F7
F12E66D0605C664CA2BF0F3001DC0, cn=MANOJ
DATTATRAYA JADHAV
Date: 2026.04.29 16:40:11 +05'30'

**( मनोज जाधव )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई
२. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
५. अवर सचिव, ( व्यय-१), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
६. कक्ष अधिकारी, (का-७) , अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
७. निवडनस्ती ( कार्या.९ ).